# मुंबई मेट्रो ३च्या कामाचा लेखाजोखा व्हिडीओतून

नम्रता सावंत-कदम

**मुंबई** : भूगर्भात असलेले १७ टीबीएम मशीन, ८००० कर्मचाऱ्यांची अहोरात्र मेहनत, भुयारे खणण्यात मिळालेले यश अशा विविध बाबीविषयी माहिती देणारा व्हिडीओ मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने जरी केला आहे. त्यामुळे मुंबई मेट्रो कामकाजाची माहिती एका क्लिकवर मिळणार आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन अर्थात एमएमआरसीएलच्या माध्यमातून कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या भुयारी मेट्रो मार्गाचे काम २०१७ मध्ये सुरू करण्यात आले. धारावीमध्ये पहिले टीबीएम भूगर्भात दाखल करण्यात आले आणि खऱ्या अर्थाने मेट्रोच्या भुयार खणण्याचा कामाला सुरुवात झाली. मुंबईसारख्या बेटावर भुयारी मेट्रो मार्ग साकार होणे असे केवळ स्वप्न वाटत असतानाच एमएमआरसीएलने हे स्वप्न सत्यात उतरवण्यात यश मिळवले. अत्यंत दाटीवाटीत मुंबईची लोकसंख्या वाढत आहे. त्यातच भविष्यात दळणवळणाच्या दृष्टीने मेट्रो ३ व्यावसायिक क्षेत्रातून जात असल्याने नोकरदार वर्गाला उपयुक्त ठरणार आहे. मेट्रो ३ दरम्यान २२.५ किमीचे भुयार खणण्यात यश मिळाले आहे. तर स्टील डेकिंगचे काम पूर्ण करण्यात आले आहे. कनेक्टिंग द अन कनेक्टड या टॅगलाईन सहित मेट्रोचे काम सुरू आहे. मे महिन्यापूर्वी नालेसफाईचे काम अत्यंत वेगाने सुरू असून, या कामामुळे मुबई तुंबण्याचे प्रमाण कमी होईल, असेही एमएमआरसीएलकडून सांगण्यात आले.